माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्र.मुमाआ/नों.क्र.८२७६/२१/अ.क्र.११७६/२५**
**क्र.मुमाआ/नों.क्र.८२७५/२१/अ.क्र.११७७/२५**

श्री.अनंत नरेश जोशी
फ्लॅट नं.३, १ ला मजला,
साईबाबा नगर, खार (पूर्व), मुंबई-४०० ०५१.

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (रस्ते) के/पश्चिम,
उप प्रमुख अभियंता (रस्ते) प.उ.यांचे कार्यालय,
रुम नं.२०४, ए विंग, दुसरा माळा, एमसीजीएम गोडाऊन बिल्डींग,
संस्कृती कॉम्प्लेक्स, ९० फिट रोड, कांदिवली (पू.), मुंबई-४०० १०१.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (रस्ते) परिमंडळ-४
उप प्रमुख अभियंता (रस्ते) प.उ.यांचे कार्यालय, रुम नं.२०४, ए विंग, दुसरा माळा,
एमसीजीएम गोडाऊन बिल्डींग,संस्कृती कॉम्प्लेक्स,
९० फिट रोड, कांदिवली (पू.), मुंबई-४०० १०१.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १६.०६.२०२५**

अपीलकर्ता : अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २२.१०.२०२० | ११.११.२०२० | १८.१२.२०२० | ०१.०३.२०२१ |

अपिलकर्तांनी माहिती अर्ज दि.२२.१०.२०२० अन्वये Improvement of various roads in CC passage/Asphalt in K/West Ward W.S. M/s. A. S. K Construction at Gilbert Hill Road under work Order No. AW-200 माहितीची मागणी केलेली आहे. जन माहिती अधिकारींनी दि.११.११.२०२० च्या पत्रान्वये के/ पश्चिम विभागातील कार्य संकेतांक क्र. एडब्ल्यू-२०० मधील रस्त्यांच्या कामासंबंधित परिरक्षित असलेल्या अभिलेखानुसार, आपण मागितलेली माहिती विविध विषयाशी संबंधित असल्याने पहिल्या विषयाची माहिती म्हणजे वर्क ऑर्डरची प्रत विनाशुल्क सोबत जोडून पाठविण्यात येत आहे असे कळविले. अपिलकर्तांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (१) अंतर्गत दि.१८.१२.२०२० रोजी माहिती अधिकार अधिनियम

२००५ अंतर्गत दि.२२.१०.२०२० रोजी सादर केलेल्या माहिती अर्जातील माहिती जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (रस्ते) के/प. यांनी दिली नाही म्हणून **प्रथम अपिल** दाखल केले.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (रस्ते) प.उ. परि-४ यांनी दि.०१.०३.२०२१ च्या आदेशान्वये जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकर्ताने मागितलेली माहितीबाबतचे सर्व पृष्ठ क्र. विहित शुल्क भरणा चलन अपीलकर्तास उपलब्ध करून देण्यात यावे व विहित शुल्क भरल्यानंतर माहिती उपलब्ध करून द्यावी असे आदेश पारित केले. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) नुसार अपिलकर्ता यांनी आयोगाकडे दि.२६.०७.२०२१ रोजी जन माहिती अधिकारींनी माहिती दिली नाही आणि सर्व माहिती विनाशुल्क देण्यात यावी असे कारण नमूद करुन **द्वितीय अपिल** दाखल केले आहे.

सदर द्वितीय अपिलांवर आज दि.१६.०६.२०२५ रोजी सुनावणीच्या वेळी अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. प्रस्तुत प्रकरणी प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांचे आदेश जन माहिती अधिकारींनी दिलेल्या उत्तराशी सुसंगत असल्याचे आढळून येतात. अपिलकर्त्यांना माहिती घेण्यास स्वारस्य असल्यास त्यांनी विद्यमान जन माहिती अधिकारींकडून सशुल्क माहिती प्राप्त करुन घ्यावी. या निर्देशासह उपरोक्त अपिलं निकाली काढण्यात येत आहेत.

**आदेश**

**वरील दोन्ही अपिले निकाली काढण्यात येत आहेत.**

( राहुल पांडे )
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १६-०६-२०२५**

State Information Commission
Maharashtra